Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ६] गुरुवार, ऑक्टोबर ७, २०२१/आश्विन १५, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २०.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**वाचा :** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक विकाअ १११५-प्र. क्र. ८८-का. ५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५.

**आदेश**

क्रमांक एमएजी-कार्या-८-टे.३-सां.ले-१०४९-२०२१.—

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी, चंद्रपूर खालील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नगर परिषद, गडचांदुर येथील नवनियुक्त एकूण सदस्य १८ व नामनिर्देशित ०२ सदस्य असे एकूण २० सदस्यांची पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. त्यांची हि नियुक्ती, नियुक्ती आदेशापासून ५ वर्ष किंवा विद्यमान नगर परिषद बरखास्त होणे किंवा पद संपूष्टात येणे यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत अस्तित्वात राहील. तसेच राज्य शासनास पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी यांची हि नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी, केव्हाही, कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील. ही मुदत संपताच किंवा त्यापुर्वी संपुष्टात आणण्यात आल्यास पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी पदासाठी प्राप्त झालेले सर्व साहित्य संबंधीत पोलीस ठाणे किंवा जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडे तात्काळ परत करण्याची सर्वस्वी जबाबदारी नियुक्त केलेल्या विशेष कार्यकारी अधिकारी यांची राहील.

**(१) विशेष कार्यकारी अधिकारी हे खालीलप्रमाणे कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम राहतील.—**

**(अ) साक्षांकनाचे काम** :—साक्षांकनासाठी, पडताळणीसाठी किंवा यथास्थिती अधिप्रमाणनासाठी त्यांच्यापुढे आणलेल्या मूळ दस्तऐवजांचे साक्षांकन, पडताळणी किंवा अधिप्रमाणन मूळ कागदपत्रे पाहूनच छायांकित प्रतीवर रबरी शिक्क्यांची मोहोर उमटवून दिनांकासह स्वाक्षरी करणे व स्वाक्षरी खाली स्वतःचे नावही लिहून साक्षांकन करावे. तसेच मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रावर जर साक्षांकन केल्यास साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील व अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तींची नियुक्ती रद्द करण्यात येईल व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीस अपात्र ठरेल.

**(ब)** उत्पन्न प्रमाणपत्र देण्याचे अधिकार विशेष कार्यकारी अधिका-यांना नसतील.

**(क)** ओळखपरेड तसेच मृत्युपूर्व जबानी यासाठी विशेष कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित राहू नये.

(२) नियुक्त करण्यात आलेल्या विशेष कार्यकारी अधिका-यांना मोहोर उमटविण्यासाठी शिक्का नजिकच्या पोलीस स्टेशनकडून उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच साक्षांकीत केलेल्या व्यक्तींची माहिती एका नोंदवहीत न चुकता नमूद करावी. ज्यावेळेस या नोंदवहीची अवलोकनासाठी मागणी पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडून केली जाईल त्यावेळी ती तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी.

(३) उक्त शासन निर्णयाद्वारे केलेल्या पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्त्या “मानसेवी” असून त्यांना सोपविण्यात आलेल्या वरील कामाबाबत कोणतेही मानधन, वेतन किंवा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

(४) प्रत्येक पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या नियुक्तीची वैधता सुस्पष्टपणे दर्शविणारे प्रमाणपत्र आपल्या विशेष कार्यकारी अधिकारी पदाच्या कामाच्या जागी सर्वांना सहजपणे दिसेल अशा ठिकाणी लावावे व या कामासाठी येणा-या व्यक्तीने मागणी केल्यास ते त्या व्यक्तीस दाखवावे.

(५) खाली दर्शविलेल्या अनुसूचीप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदुर नगर परिषद येथील निर्वाचित एकूण १८ सदस्य व नामनिर्देशीत २ सदस्य असे एकूण २० सदस्यांची पदसिद्ध विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | सदस्यांचे नाव | नोंदणी क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | सौ. सविता सुरेश टेकाम | २०२१/१३/४५५८११३३९६१०/०१ |
| २ | श्री. शरद सुरेश जोगी | २०२१/१३/२२७५७१९५५५६९/०२ |
| ३ | सौ. अर्चना शिवाजी वांढरे | २०२१/१३/९२२१२५७०१२८०/०३ |
| ४ | श्री. रामसेवक सतुजी मोरे | २०२१/१३/४२६६५८६०७०२६/०४ |
| ५ | कु. जयश्री राहुल ताकसांडे | २०२१/१३/५६८०९४०६८९२२/०५ |
| ६ | श्री. अरविंद तुकाराम डोहे | २०२१/१३/६७३३७७४०२८६८/०६ |
| ७ | सौ. कल्पना अरुण निमजे | २०२१/१३/३०८९८५९४८९५४/०७ |
| ८ | श्री. विक्रम नामदेव येरणे | २०२१/१३/३२३८३४७२०४४७/०८ |
| ९ | सौ. अश्विनी सचिन कांबळे | २०२१/१३/४५१६५५८४६४४१/०९ |
| १० | श्री. अरविंद सुभाष मेश्राम | २०२१/१३/४००८४८६०१५०१/१० |
| ११ | सौ. वैशाली सुनिक गोरे | २०२१/१३/९२०६५९५७९४१२/११ |
| १२ | सौ. मिनाक्षी अशोक एकरे | २०२१/१३/७०२६२२४९७७४९/१२ |
| १३ | श्री. शेख सरवर शेख शालू | २०२१/१३/२१२८४४१२५७७४/१३ |
| १४ | श्री. राहुल नारायण उमरे | २०२१/१३/७९७०४७४५५०४३/१४ |
| १५ | सौ. रजिया सुल्ताना शेख खाजा | २०२१/१३/४७२१३७५१८५८५/१५ |
| १६ | सौ. सुनिता बंडू कोडापे | २०२१/१३/३९५८५६३६८१४६/१६ |
| १७ | श्री. सागर सुरेश ठाकूरवार | २०२१/१३/६७३९३९५७८८३८/१७ |
| १८ | सौ. किरण सुधाकर अहिरकर | २०२१/१३/८८७९७१६२५२८०/१८ |
| १९ | श्री. धनंजय सोहनलाल छाजेड | २०२१/१३/३८२५१०९४४८४८/१९ |
| २० | श्री. पापय्या बलराज पोन्नमवार | २०२१/१३/६८८२७६९१८६६७/२० |

चंद्रपूर :
दिनांक ५ ऑक्टोबर २०२१.

**अजय गुल्हाने,**
जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.